C.H.M.E. Society's

# Bhonsala Military College

**Rambhoomi, Nashik-422005**

---

## Department of Political Science

**Departmental Activities**:

### 'संविधान दिन' साजरा करण्यात आला

भोसला मिलिटरी कॉलेज,नाशिक राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 26 नोव्हेंबर 2021 रोजी महाविद्यालयात 'संविधान दिन' साजरा करण्यात आला. सुरुवातीला संविधानावर आधारित Quiz Competition घेण्यात आली.. तसेच 'भारतीय संविधानाची उद्देशिका वाचन' करण्यात आले. डॉ.व्ही.पी. पवार सरांनी 'भारतीय संविधानाचे महत्व' या विषयावर तर डॉ. राऊत सरांनी 'संविधान व आपली जबाबदारी' या विषयावर प्रबोधन केले. याप्रसंगी प्रिया कुमावत या विद्यार्थिनीने भारतीय संविधानाची संक्षिप्त ओळख करून दिली. प्रवीण लोखंडे या विद्यार्थ्याने स्वरचित "मै भारत का संविधान" ही कविता सादर केली. प्रा. मयुर पेठकर यांनी 'भारतीय संविधानाचे तत्वज्ञान' याविषयी मार्गदर्शन केले.





"भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी स्मृति वादविवाद स्पर्धा"

भोसला मिलिटरी कॉलेजच्या राज्यशास्त्र विभागातर्फे आयोजित "भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी स्मृति वादविवाद स्पर्धा" दि. 24 डिसेंबर 2021 रोजी महाविद्यालयात पार पडली. या स्पर्धेचा विषय 'कोणती शिक्षणपद्धती चांगली : ऑनलाईन की ऑफलाईन..?' हा होता. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेच्या परीक्षणाचे काम डॉ.सावंत, डॉ.गुगाणे व प्रा.वाघ यांनी पार पाडले. मान्यवरांच्या हस्ते प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. मा.प्राचार्य महोदय यांची कार्यक्रमाला विशेष उपस्थिती व मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मयुर पेठकर यांनी तर आभारप्रदर्शन राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.व्ही.पी.पवार यांनी केले.



## ग्रामपंचायत कोटमगाव येथे क्षेत्रभेट (**Field Visit)**

भोंसला मिलिटरी कॉलेज राज्यशास्त्र विभागातर्फे दि. 25 फेब्रु. 2022 रोजी ग्रामपंचायत कोटमगाव येथे क्षेत्रभेट (Field Visit) आयोजित केली गेली होती. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचे कामकाज कसे चालते याविषयी विदयार्थ्यांना माहिती मिळावी यासाठी ह्या भेटीचे आयोजन केले गेले. याप्रसंगी ग्रामविकास अधिकारी श्री. बाळासाहेब कदम यांनी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 नुसार ग्रामपंचायतीचे दैनंदिन कामकाज, ग्रामसभेचे महत्त्व, केंद्र व राज्य शासनाचे अनुदान व महत्वपूर्ण योजना याविषयी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी माझी वसुंधरा अभियानांतर्गत पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली. विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, जलशुद्धीकरण केंद्र, कचरा विलगीकरण केंद्र यांची पाहणी करून त्याविषयी माहिती जाणून घेतली. या क्षेत्रभेटीचे नेतृत्व प्रा.मयुर पेठकर यांनी केले. सदर उपक्रमास  राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.व्ही.पी. पवार व मा.प्राचार्य महोदयांचे मार्गदर्शन लाभले.






## 'राजकीय जाणीव-जागृती सर्वेक्षण 2022'

भोंसला मिलिटरी महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागातर्फे राबवण्यात आलेल्या 'राजकीय जाणीव-जागृती सर्वेक्षण 2022' च्या विश्लेषणासाठी दि. 21 एप्रिल 2022 रोजी महाविद्यालयात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. सावंत यांनी सदर सर्वेक्षणाच्या विश्लेषणाचे महत्व, संशोधनाच्या विविध पद्धतीच्या आधारे सर्वेक्षणाची मांडणी तसेच संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण याविषयी स्मार्ट क्लासरूमच्या सहाय्याने महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. याप्रसंगी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.व्ही.पी.पवार उपस्थित होते. कार्यशाळेचे समन्वयक म्हणून प्रा.मयूर पेठकर यांनी जबाबदारी पार पडली. सदर कार्यशाळेस माननीय प्राचार्य महोदयांचे मार्गदर्शन लाभले.





## 'किल्ले दुर्गभांडार' येथे क्षेत्रभेट (**Field Visit)**

भोसला मिलिटरी कॉलेज राज्यशास्त्र विभागातर्फे दि. 29 सप्टें. 2022 रोजी 'किल्ले दुर्गभांडार' येथे क्षेत्रभेट (Field Visit) आयोजित केली गेली होती. दुर्गबांधणीचा उत्कृष्ट नमुना म्हणून या किल्ल्याचे विशिष्ट स्थान आहे. उभ्या डोंगराच्या कातळात कोरलेल्या पायऱ्या तसेच ब्रह्मगिरी व दुर्गभांडारला जोडणारी अतिशय चित्तथरारक नैसर्गिक अरुंद खाच हे या किल्ल्याचे प्रमुख आकर्षण आहे. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटीविषयी आपले अनुभव व्यक्त केले. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे नवीन प्रदेशाची, नव्या व्यक्तींची ओळख होऊन आपले अनुभवविश्व समृद्ध होण्यात मदत होते. ट्रेकिंगमुळे स्वतःतील अंगभूत क्षमतांची नव्याने ओळख होऊन आत्मविश्वासात वाढ होते. एकंदरीतच 'अनुभवातून शिक्षण आणि प्रबोधन' घडून सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकसनात मदत होते. या क्षेत्रभेटीचे नेतृत्व प्रा.मयुर पेठकर यांनी केले. सदर उपक्रमास मा. विभागप्रमुख डॉ.व्ही.पी.पवार व मा.प्राचार्य महोदयांचे मार्गदर्शन लाभले.






## “राज्यघटनेची प्रासंगिकता (**Relevance of Constitution)”**

भोसला मिलिटरी कॉलेज राज्यशास्त्र विभागातर्फे 26 नोव्हेंबर संविधान दिन निमित्त “ राज्यघटनेची प्रासंगिकता (Relevance of Constitution)” या विषयावर आंतरमहाविद्यालयीन निबंधस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पुणे विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांनी उस्फुर्ततेने प्रतिसाद नोंदवला होता. दि. 22 जानेवारी 2023 रोजी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले.



## कळसूबाई शिखर येथे क्षेत्रभेट (**Field visit)**

भोसला मिलिटरी कॉलेजच्या संरक्षणशास्त्र विभागातर्फे दि. 8 फेब्रुवारी 2023 रोजी कळसूबाई शिखर येथे क्षेत्रभेट (Field visit) आयोजित केली गेली होती. अहमदनगर जिल्ह्यामधील अकोले तालुक्यातील कळसुबाई हे महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर असून समुद्रसपाटीपासून सुमारे 1646 मीटर उंचीवर वसलेले आहे. या क्षेत्रभेटीमध्ये राज्यशास्त्र विभागाचे 11 विदयार्थी व प्रा.मयुर पेठकर यांनी सहभाग नोंदवला. या उपक्रमास मा.प्राचार्यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

